Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# महिला सक्षमीकरणात ग्रंथालयाचे योगदान

**प्रा. सचिन भाऊराव काळे,** ग्रंथपाल, वेस्ट खान्देश भगिनी सेवा मंडळ संचलित, कला व वाणिज्य महिला महाविद्यालय देवपूर, धुळे

**सारांश**

ग्रंथालय हे महिलांच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक सक्षमीकरणासाठी एक प्रभावी साधन आहे. शिक्षण मानवी जीवनाचे एक अविभाज्य अंग आहे. महिलांच्या जीवनाचा स्तर उंचावण्याचे कार्य शिक्षणाच्या माध्यमातून केले जाते. महिलांच्या शैक्षणिक व सामाजिक जीवनात शिक्षण घेत असताना ग्रंथालय महत्त्वाची भूमिका बजावत असतात. शैक्षणिक व सार्वजनिक ग्रंथालयाच्या माध्यमातून समाजाचा सर्वांगीण विकास साधता येतो. आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ग्रंथालयात अमाप स्वरूपात माहितीचे साधने निर्माण करण्यात आलेली आहे त्याचा वापर करून भारतीय महिला आपल्या ज्ञान कक्षा रुंदावू शकतात. ज्याप्रमाणे ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या जात असतात त्याचप्रमाणे माहितीची गरज वाढत जाते आणि ही गरज पूर्ण करणे हे ग्रंथालयाचे कर्तव्य असते. त्या अनुषंगाने शैक्षणिक व सार्वजनिक ग्रंथालयात विविध प्रकारच्या ग्रंथालयीन सेवा देण्यात येतात. ग्रंथालय म्हणजे केवळ पुस्तके, ग्रंथ जतन करण्याचे केंद्र नसून अद्यावत माहितीचे ज्ञान स्तोत्र होय. महिलांच्या सक्षमीकरणात ग्रंथालयाचे योगदान अधिक व्यापक आहे. यामध्ये केवळ ज्ञानप्रसाराचा भाग नाही तर सामाजिक, मानसिक आणि भावनिक सक्षमीकरणाची प्रक्रिया देखील सामावलेली आहे.

**प्रस्तावना**

भारतीय समाजात शैक्षणिक आणि सामाजिक स्तर उंचावण्याचे एक साधन म्हणून ग्रंथालयाकडे पाहता येईल. आजच्या माहिती युगात ग्रंथालय हे महत्त्वाची भूमिका बजावत असतात. ग्रंथालये स्त्रियांच्या अनुभवांचे आणि दृष्टिकोणांचे प्रामाणिकपणे प्रतिनिधित्व करणारे वैविध्यपूर्ण संग्रह तयार करून न्यायप्रवेशाला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका निभावतात. यामध्ये साहित्य संशोधन आणि मल्टीमीडिया साहित्य समाविष्ट करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे समाविष्ट आहे. संस्कृती, वंश आणि सामाजिक संदर्भ यामध्ये महिलांचे प्रतिनिधित्व सुनिश्चित करते.

शैक्षणिक ग्रंथालय हे शालेय शिक्षणापासून ते विद्यापीठ शिक्षणापर्यंत ज्ञानार्जन करताना सहायक ठरतात. तसेच सार्वजनिक ग्रंथालय हे सामाजिक उन्नती साधण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरतात. या सर्व प्रकारच्या ग्रंथालयातून महिला वर्गास विविध प्रकारच्या ग्रंथालयीन सेवा दिल्या जातात. ग्रंथालयांना सामाजिक बदल आणि सक्षमीकरणाचे शक्तिशाली माध्यम मानले गेले आहे. महिलांचे अधिकार आणि सक्षमीकरण वाढविण्यात त्यांची भूमिका मोलाची आहे ग्रंथालय लैंगिक समानतेला चालना देण्यासाठी आणि जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत. ग्रंथालय महिलांना समाजातील त्यांच्या पूर्ण क्षमतेची जाणीव करून देऊन महिला सक्षमीकरणाला उत्प्रेरित करतात. महिलांच्या सक्षमीकरणांमध्ये ग्रंथालयाचा परिवर्तनीय प्रभाव दिसून येत असतो.

ग्रंथालयामधून महिलांना साहित्य ,काव्य, कला आणि इतिहास यांचे सखोल ज्ञान मिळते. स्थानिक व राष्ट्रीय स्तरावरील सांस्कृतिक उपक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरणा मिळते. प्रेरणादायक आत्मचरित्र


Copyright © | JET Network, All Rights Reserved

यशोगाथा आणि सामाजिक बदल घडवणाऱ्या महिलांची माहिती उपलब्ध करून देऊन महिलांना आत्मविश्वास व पुढे जाण्याची प्रेरणा ही ग्रंथालयामार्फत दिली जाते. ग्रंथालय महिलांसाठी विचारविनिमय, चर्चासत्रे व गटचर्चा साठी जागा उपलब्ध करून देतात. महिलांचे अनुभव व समस्या समजून घेण्यासाठी समाजातील इतर घटकांशी संवाद साधण्याची संधी ग्रंथालयामार्फत महिलांना मिळते.

**उद्देश**

1. भारतीय महिला सक्षमीकरणासाठी ग्रंथालये व ग्रंथालयीन सेवांचा वापर करून उपक्रमांचा शोध घेणे.
2. महिला सक्षमीकरणासाठी कायदे, अधिकार आणि आरोग्याशी संबंधित माहिती ग्रंथालयाद्वारे उपलब्ध करणे.
3. महिला सक्षमीकरणासाठी ग्रंथालयांनी शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, आणि राजकीय क्षेत्रात बजावलेल्या भूमिकेचे मूल्यांकन करणे.
4. महिलांसाठी ग्रंथालयामध्ये विविध कार्यशाळा व कार्यक्रमाचे आयोजन करणे.
5. ग्रंथालयाद्वारे महिलांना त्यांच्या विचाराचे आदानप्रदान करण्यासाठी व्यासपीठ प्रदान करणे.

**महिला सक्षमीकरणाची व्याख्या**

महिला सक्षमीकरण म्हणजे त्यांच्यात असणाऱ्या सुप्त क्षमतांचा विधायक विकास होणे होय. तसेच महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, आणि मानसिक दृष्ट्या सक्षम बनवून त्यांना स्वतःच्या हक्कासाठी जागरूक करणे, स्वयंपूर्ण बनवणे, आणि निर्णयक्षमतेची संधी देणे जेणेकरून त्या समान हक्क आणि संधी मिळवून शकतील. महिला सक्षमीकरण ही एक दीर्घकाळ व निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, "महिलांचा विकास म्हणजेच समाजाचा विकास.
2. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मते, "जर तुम्हाला देशाच्या प्रगतीचे मूल्यमापन करायचे असेल तर त्या देशातील महिलांची स्थिती काय आहे हे पहा."
3. संयुक्त राष्ट्र संघ यांच्या मते, "महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना त्यांचे हक्क, जबाबदाऱ्या आणि संधी मिळवण्यासाठी सक्षम बनवणे जेणेकरून त्या आपल्या जीवनावर संपूर्ण नियंत्रण ठेवू शकतील."

**महिला सक्षमीकरणाचे घटक**

1. शैक्षणिक सक्षमीकरण - महिलांसाठी शिक्षण हा एक महत्त्वाचा घटक आहे. स्त्रियांच्या शिक्षणाला प्राधान्य देणे, शिक्षणातील असमानता दूर करणे.
2. आर्थिक सक्षमीकरण – महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, स्वयंरोजगारासाठी मदत करणे.
3. सामाजिक सक्षमीकरण – महिलांना समाजात समानता मिळवून देणे. महिलांवरील अन्याय, अत्याचार, भेदभाव कमी करून समान हक्क देणे.
4. राजकीय सक्षमीकरण - महिलांना राजकारणात सक्रिय सहभाग घेण्यास प्रोत्साहन देणे व राजकारणात सक्षम बनवणे.
5. कौटुंबिक आणि मानसिक सक्षमीकरण - महिलांना कुटुंबात योग्य स्थान मिळवून देणे तसेच मानसिक दृष्ट्या, वैचारिक दृष्ट्या सशक्त बनवून स्वतंत्र निर्णय घेण्याची क्षमता विकसित करणे.

**महिला सक्षमीकरणात ग्रंथालयाचे योगदान**


Copyright © | JET Network, All Rights Reserved

**1) महिलांच्या शैक्षणिक विकासासाठी ग्रंथालयाचे पाठबळ**

ग्रंथालय केवळ पुस्तके साठवण्याची ठिकाणे नसून ती ज्ञान, शिक्षण व विकासाची केंद्र आहेत. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सक्षमीकरणासाठी ग्रंथालयाची भूमिका महत्त्वाची आहे. ग्रंथालये महिलांना शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देतात. महिलांसाठी उच्च शिक्षण, रोजगार संधी, कौशल्य विकास यासाठी मार्गदर्शक पुस्तकांचा संग्रह ग्रंथालयात उपलब्ध असतो. त्याचा वापर करून महिला शैक्षणिक क्षेत्रात सक्षम बनते.

**2) महिलांच्या कलात्मक विकासासाठी ग्रंथालये**

महिलांमध्ये असणाऱ्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी ग्रंथालये सहाय्यकारी ठरतात. ग्रंथालयात महिलांना हस्तकला, चित्रकला, भरतकाम यासारख्या पारंपारिक कौशल्यावर आधारित मार्गदर्शनपर साहित्य उपलब्ध करून दिले जाते. त्याचप्रमाणे कला प्रदर्शन व विक्रीसाठी विशेष उपक्रम आयोजित केले जातात. महिलांना शास्त्रीय संगीत, नृत्य याबद्दल देखील माहिती मिळवून त्यांची आवड जोपासता येते.

**3) ग्रंथालये आणि महिलांचे व्यक्तिमत्व विकास**

महिलांना त्यांच्या व्यक्तिमत्व विकासात भर पाडण्यासाठी ग्रंथालयांची मोलाची साथ लाभते. पुस्तक वाचन गट, चर्चासत्रे आणि व्याख्याने, प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाशी संवाद यासारख्या उपक्रमामुळे महिलांचे व्यक्तिमत्व विकसित होण्यास मदत होते. महिलांच्या व्यक्तिमत्व विकसित करण्यासाठी ग्रंथालयाद्वारे प्रेरणादायी सत्र घेतली जातात. वाचन गट महिलांना स्वावलंबी बनण्यासाठी प्रेरणा देतात. आपले विचार मांडण्यासाठी एक व्यासपीठ ग्रंथालय महिलांसाठी निर्माण करून देते.

**4) महिला सक्षमीकरणासाठी ग्रंथालयातील विशेष उपक्रम**

काही विशेष ग्रंथालयामध्ये महिलांसाठी साहित्याचा एक विभाग राखीव ठेवला जातो ज्यामध्ये स्त्री सक्षमीकरणावर आधारित मासिके, पुस्तके, संदर्भ ग्रंथ, संशोधन साहित्य उपलब्ध असते. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी असणाऱ्या सरकारी योजना, शिष्यवृत्ती आणि प्रशिक्षण कार्यक्रमाची माहिती ग्रंथालयाद्वारे दिली जाते. तसेच विविध विषयावर कार्यशाळा व शिबिरे आयोजित करून महिलांना मार्गदर्शन दिले जाते.

**5) ग्रंथालय आणि महिला सुरक्षा**

महिलांसाठी स्वसुरक्षा साहित्य जसे की स्वरक्षण तंत्र, आपत्ती व्यवस्थापन, आत्मविश्वास वाढवणारी पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध असतात. महिला संरक्षण कायदे, न्यायव्यवस्था, सोशल मीडियाचा जबाबदार वापर, सायबर सुरक्षा, इंटरनेटवरील फसवणूक टाळणे याबद्दलची माहिती ग्रंथालयातून मिळते. ग्रंथालयामुळे महिलांना विविध विषयावर अभ्यास व संशोधनाची संधी मिळते. त्यामुळे आत्मनिर्भरता आणि आत्मविश्वास वाढविण्यासाठी आवश्यक ज्ञान त्यांना प्राप्त होते.

**6) ग्रंथालये आणि ग्रामीण महिलांचा विकास**

ग्रंथालय गावागावांमध्ये जाऊन पुस्तके व इतर वाचन साहित्य महिलांसाठी उपलब्ध करून देतात. महिला बचत गट, अंगणवाडी, जिल्हा परिषद शाळा याद्वारे वाचन साहित्य ग्रामीण भागातील महिलांपर्यंत पोहोचविले जाते. याद्वारे महिलांचा विकास साधता येतो. ग्रामीण भागातील महिलांना ग्रंथालयामार्फत शेती, दुग्ध व्यवसाय, गृह उद्योग, पशुपालन याविषयी माहिती देणारी पुस्तके उपलब्ध करून दिली जातात. तसेच नैसर्गिक शेती, खत निर्मिती, जलसंधारण, पाणी नियोजन, आधुनिक शेती व बाजारपेठेची माहिती मिळते तसेच त्याचा उपयोग कसा करावा याची माहिती दिली जाते.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

**7) डिजिटल ग्रंथालयाची भूमिका**

महिलांसाठी ग्रंथालयात विविध भाषांमध्ये ई-बुक्स आणि ऑडिओ बुक्स सहज उपलब्ध असतात, ज्यामुळे त्या घरबसल्या शिक्षण घेऊ शकतात. ऑनलाइन व्यासपीठावरील प्रशिक्षण कार्यक्रम ग्रंथालयाद्वारे राबविले जातात. ग्रंथालयामध्ये संगणक, इंटरनेट आणि डिजिटल माध्यमांचा वापर करून महिलांना माहिती मिळवण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध होते. यामुळे महिलांचा तंत्रज्ञानावर विश्वास वाढतो आणि त्यांना स्वतःच्या विकासासाठी अधिक साधने मिळतात त्याद्वारे महिला अधिक सक्षम होतात.

**8) आर्थिक सबलीकरण**

महिलांना आर्थिक बाबतीत सक्षम बनवण्यासाठी ग्रंथालय विविध पुस्तके, कार्यशाळा, चर्चासत्रे आणि उच्च शिक्षणासाठी आवश्यक मार्गदर्शन पुरवतात. वित्तीय साक्षरतेवर आधारित साहित्य, व्यावसायिक योजना याचे देखील मार्गदर्शन ग्रंथालयात उपलब्ध असते. ग्रंथालय महिलांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी उपयोगी ठरतात. मार्केटिंग, फायनान्स, नवनवीन तंत्रज्ञानाच्या वापराबाबत पुस्तके ग्रंथालयात मिळतात. कौशल्य विकास केंद्र, लघुउद्योग, शेतीवर आधारित व्यवसाय, गृह उद्योग, हस्तकला यासारख्या कार्यशाळा ग्रंथालयाद्वारे आयोजित केल्या जातात. ज्यामुळे महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम होण्यास मदत होते.

**9) भावनिक व मानसिक विकास**

ग्रंथालयाद्वारे महिलांना मानसिक आरोग्य व तणावाच्या व्यवस्थापनासाठी विविध पुस्तकांचा अभ्यास करण्याची संधी मिळते. स्त्री शक्ती, संघर्ष, आत्मविश्वास आणि आत्मनिर्भरता यावर आधारित साहित्य ग्रंथालयात उपलब्ध असते. शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याच्या दृष्टीने ग्रंथालय महत्त्वाची भूमिका पार पाडतात. मानसिक आणि भावनिक सक्षमीकरणासाठी ग्रंथालय ही एक महत्त्वपूर्ण साधन आहेत. ग्रंथालयाद्वारे महिलांना वैचारिक दृष्ट्या सशक्त बनवण्यास मदत होते.

**10) सामाजिक सशक्तीकरण**

महिलांना सामाजिक समानता, महिलांचे अधिकार, स्त्री सक्षमीकरण, हिंसा व अन्याय, लैंगिक असमानता या संदर्भात योग्य ती माहिती व पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध असतात. यशस्वी महिलांचे प्रेरणादायी साहित्य वाचनाने त्यांचे आत्मभान व समाजात स्थान वाढते. समाजात महिलांना समान अधिकार मिळवून देणे तसेच स्त्री-पुरुष समानतेवर आधारित कार्यक्रम ग्रंथालयात आयोजित करून सामाजिक जाणीव वाढवली जाते. महिलांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देण्यासाठी वाचन सत्र, कार्यशाळा या ग्रंथालयाद्वारे आयोजित केले जातात. महिलांचे अधिकार, कायदे, स्त्री-पुरुष समानता, आरोग्य कुटुंब नियोजन, या बाबत जागृती करण्यासाठी ग्रंथालय महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

**निष्कर्ष**

ग्रंथालय ही महिलांच्या सक्षमीकरणासाठी एक प्रभावी माध्यम आहे. सामाजिक बदल व व्यक्तिमत्व विकासाचा पाया ग्रंथालयाच्या माध्यमातून मजबूत होतो. या माध्यमातून महिलांना शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व सामाजिक प्रगतीची दालने उपलब्ध होतात. महिलांनी ग्रंथालयाचा अधिकाधिक उपयोग केल्यास त्यांना स्वतःच्या विकासासाठी तसेच समाजातील त्यांच्या स्थानाला बळकट करण्यासाठी मोठी मदत होऊ शकते. ग्रंथालय केवळ पुस्तके व संदर्भ साहित्याचा संग्रह नसून ही महिलांच्या जीवनात त्या विविध पैलूंवर सकारात्मक परिणाम करणारी संस्था आहे. ज्याचा परिपूर्ण वापर करून महिला आपले जीवन समृद्ध बनवू शकतात.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

1. महिलांना अधिक सक्षम, सशक्त, आणि आत्मनिर्भर बनण्यासाठी ग्रंथालयाचे महत्वपूर्ण योगदान आहे.
2. ग्रंथालय महिलांसाठी शिक्षण सक्षमीकरण व व्यक्तिमत्व विकासाचे प्रभावी साधन आहे.
3. आजच्या डिजिटल युगात महिलांसाठी ऑनलाईन ग्रंथालय मोठ्या प्रमाणावर फायदेशीर ठरत आहेत.
4. ग्रंथालय महिलांसाठी शिक्षण सक्षमीकरण व व्यक्तिमत्व विकासाचे प्रभावी साधन आहे.
5. ग्रामीण भागातील महिलांना शेती आरोग्य आणि शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम करण्यात ग्रंथालय उपयुक्त ठरतात.

**संदर्भ सूची**

1. ग्रंथालय व माहितीशास्त्र 2013 श्री. सूतार धनंजय, धनंजय प्रकाशन कोल्हापूर.
2. फडके द. ना. 2004 ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण पुणे, युनिव्हर्सल प्रकाशन.
3. https://ndl.iitkgp.ac.in
4. https://wikipedia.org/wiki/digital/library
5. www.netlibrary.com


Copyright © | JET Network, All Rights Reserved